Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl. No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email :- secretary.stateboard@gmail.com

Tel :- Chairman (p) :- STD (020)-25651751 EPABX :-(020)-25705000 Secretary(P) :- (020)-25651750

क्र.रा.म./परीक्षा-८/ ६२५७
पुणे -४११००४
दिनांक -१८/१२/२०१९

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी ) फेब्रु-मार्च २०२० नियमित, पुनर्परीक्षार्थी, तुरळक विषय, श्रेणासुधार योजनेअंतर्गत व खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत ...**

**संदर्भ:- जा.क्रं.रा.मं./परीक्षा-३/५७१० दिनांक १६/११/२०१९ चे पत्र.**

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र.९३ अन्वये फेब्रु-मार्च २०२०मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस नियमित, पुनर्परीक्षार्थी, तुरळक विषय, श्रेणासुधार योजनेअंतर्गत व खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह ऑनलाईन परीक्षेची आवेदनपत्र स्विकारण्याची मुदत दिनांक ०५/१२/२०१९ रोजी संपली आहे. त्यानंतर दिनांक ०६/१२/२०१९ ते दिनांक १९/१२/२०१९ पर्यंत आवेदनपत्र स्विकारण्याची प्रक्रिया स्थगित करण्यात आलेली आहे. सदर मुदत संपल्यानंतरही (१) श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाच्या कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु.५०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रती दिन रु.१००/- विशेष अतिविलंब शुल्क व तदनंतरच्या १५ दिवसांकरीता व परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत रु.२०० प्रमाणे (शासनाचे क्र.एसएससी-२०११(१८५/११)/उमाशि-२ दिनांक ०२ फेब्रु २०१२ च्या पत्रानुसार ) अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

**विलंब शुल्कानंतरची अति विलंब/विशेष अतिविलंब/अति विशेष अतिविलंब शुल्काची आवेदनपत्रे ही कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.maharashtra.gov.in या किंवा www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्यानंतर विद्यार्थी व प्राचार्य / मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची मूळ प्रत (Print Out) शुल्कासह विभागीय मंडळाकडे सादर करण्याबाबत कनिष्ठ महाविद्यालयांना कळवावे. कनिष्ठ महाविद्यालये आवेदनपत्रे मंडळाकडे जमा करण्यास येतील अशा कनिष्ठ महाविद्यालयांकडून नियमानुसार आवेदनपत्र जमा करण्याच्या दिवसांपर्यंतचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अति विशेष अतिविलंब शुल्क घेण्यात यावे.**

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिममुदत (रु.१००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अति विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.२००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा | शुक्रवार दिनांक २०/१२/२०१९ ते रविवार दिनांक ०५/०१/२०२० | सोमवार दिनांक- ०६/०१/२०२० ते सोमवार दिनांक- २०/०१/२०२० | मंगळवार दिनांक-२१/०१/२०२० ते शुक्रवार दिनांक- ३१/०१/२०२० |

*** विभागीय मंडळाच्या परीक्षा शाखेने प्राप्त शुल्क व ऑनलाईन आलेली आवेदनपत्रे यांची तपासणी करणे आवश्यक आहे.**

पुर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे विशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबंधित कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट- अ) विहीत प्रपत्रांसह पाठविण्यात यावे. तसेच संदर्भीय पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावे व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी.

सोबत जोडलेल्या विहीत तक्यामध्ये विद्यार्थ्यांबाबतची संपूर्ण अचूक माहिती (कालावधी व दंडाची रक्कम) तपासून सदर तक्ता (परिशिष्ट- ब) मा. विभागीय अध्यक्ष यांच्या शिफारशी व स्वाक्षरीसह मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचे मंजूरीकरिता पाठविण्यात यावा. **मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांच्या मंजुरीशिवाय सदर विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.** मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचेकडे विद्यार्थ्यांकडून परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याबाबतही सर्व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात यावे.

कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त झालेला माहितीचा तक्ता (परिशिष्ट–अ) राज्यमंडळाकडे पाठविण्यात येऊ नये. तसेच इतर कागदपत्रेही राज्यमंडळाकडे पाठवू नयेत. (उदा. विद्यार्थ्यांचा अर्ज, वैद्यकिय दाखला इ.) याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात यावा.

राज्यमंडळ कार्यालयाकडून अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र स्विकारण्याची मंजुरी परीक्षा सुरु होण्यापूर्वी घेण्यात यावी. तसेच राज्यमंडळ कार्यालयाकडून परीक्षा सुरु होण्यापूर्वी मंजुरी देणे शक्य होईल, अशा बेताने अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काचे आवेदन पत्राचे तक्ते राज्यमंडळाकडे सादर करण्यात यावेत तसेच दिनांक ३१/०१/२०२० नंतर ऐनवेळेस प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांसाठी प्राप्त दिनांकापर्यंत अतिविशेष अतिविलंब शुल्क रु.२००/- प्रतिदिन आकारण्यात यावे व त्यांची मंजूरी सबळ कागदपत्रासह प्रस्ताव पाठवून दिनांक १७/०२/२०२० पूर्वी मान्यता घेण्यात यावी.

**कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

सोबत- परिशिष्ट 'अ' 'ब' व शुल्क आकारावयाचा तक्ता

सचिव

राज्यमंडळ, पुणे-०४.

क्र.कोविमं/इ.१२ वी परीक्षा/2724
कोल्हापूर ४१६००४,
दिनांक: १९/१२/२०१९.

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा,सांगली,कोल्हापूर.

वरीलप्रमाणे इयत्ता १२ वी फेब्रु./मार्च २०२० परीक्षेसाठी अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

**-परिशिष्ट - अ-**

परीक्षेचे नावः---------------------------------

विभागीय मंडळाचे नांव : ---------विभागीय मंडळः-------

प्रकरणिका क्रमांक-------------------------------

**विद्यार्थ्यांची मुदतबाह्य आवेदनपत्रे स्वीकारण्याबाबत शिफारस**

इ. १२वी

१) विद्यार्थ्याचे नांव ----------------------------------------

२) उ.मा.शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव व पत्ता ---------------------------------

३) उ.मा.शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक क्रमांक ------------------------------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्या बाबत खालील कारणासमोर (  ) खूण करावी.

**अ** (  ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार **ब** (  ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

**क** (  ) नैसर्गिक आपत्ती **ड** (  ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

**इ** ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास.

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

१)------------------------------२)--------------------

३)------------------------------४)--------------------

५)------------------------------------------------------

६) उ.मा.शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांची शिफारस :-

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**प्राचार्य स्वाक्षरी व शिक्का**

७) **अ)** अतिविलंबाचे एकूण दिवस- ----------- **ब)** अतिविलंबाच्या दंडाची रक्कम------

**क)** दंड कशा प्रकारे भरला - रोख / धनाकर्ष (डी.डी.) / चलन क्रमांक--------------

**ड)** विभागीय अध्यक्षांची शिफारस ----------------------------------

--------------------------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ व ९३ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्याचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

**विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,विभागीय मंडळाचे नाव व शिक्का.**